सोबत मा. प्र.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे **अभिमत विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शासनाची प्रचलित शिष्यवृत्ती प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबतचे पत्र** क्र.१८/तंशिसं/डीबीटी/अभिमत/२०२३/१४४ दिनांक ३१.५.२०२३ परिपत्रक सोबत जोडलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

पृष्ठांकन क्र: तंशिविकाअ/शिक्षण/२०२३/ 1528
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 05 JUN 2023

**प्रति,**

**कुलसचिव,** संबंधित अभिमत विद्यापीठ, अमरावती विभाग,अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

**(श्री. म. म. अंधारे)**
प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

F/C

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७

ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/अभिमत/२०२३/ १४४

दिनांक :-३१/ ०५ / २०२३

प्रति,

कुलसचिव

सोबत जोडलेल्या यादीतील सर्व अभिमत विद्यापीठे,

महाराष्ट्र राज्य.

विषय :- अभिमत विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शासनाची प्रचलित शिष्यवृत्ती प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत ....

संदर्भ : १.शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४ दि.०७/१०/२०१७

२.शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.सीटीसी-२०२०/प्र.क्र.२३/तांशि-४ दि.२३/०२/२०२३

उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासनाच्या संदर्भीय शासन निर्णय क्र १ नुसार, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहायित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये / तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** ( Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Shishyavrutti Yojna ) तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येते. सदर योजनेकरीता कुटुंबाचे **वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखा पर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

- सदर योजना शासनाच्या महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येते. ( https://mahadbt.maharashtra.gov.in ).
- सदर योजनांची एकूण मंजुर रक्कम दोन हप्त्यांमध्ये Direct Benefit Transfer (DBT) अंतर्गत थेट लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या डीबीटी पोर्टलद्वारे त्यांच्या आधार संलंग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते.
- महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांकडून भरण्यात आलेल्या अर्जांची तपासणी व लाभ वितरणाची प्रचलित कार्यपध्दती सोबत जोडलेली आहे. Annex-A

तसेच, उपरोक्त विषयांकीत संदर्भीय शासन निर्णय क्र.२, आपल्या अवलोकनार्थ व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून, राज्यातील अभिमत विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या व राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीकरिता पात्र ठरणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना **सन २०२२-२३** हया शैक्षणिक वर्षापासून **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना** लागू करण्यात आलेली आहे.

तरी, संदर्भीय शासन निर्णय क्र.२ मध्ये **तंत्रशिक्षण अंतर्गत** नमूद करण्यात आलेल्या अभ्यासक्रमामध्ये अभिमत विद्यापीठातील प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर योजनेच्या पात्रतेनुसार लाभ डीबीटी पोर्टल मार्फत देण्याच्या दृष्टीने डीबीटी पोर्टलवर राज्यातील अभिमत विद्यापीठांच्या नावाची नोंदणी करुन, नोंदणी करण्यात आलेल्या अभिमत विद्यापीठांतर्गत विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईनरित्या भरुन घेण्यासाठी व विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरलेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी डीबीटी पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्ड देण्यासाठी सोबत जोडलेल्या Annex-B ( B1,B2,B3 ) मध्ये देण्यात आलेल्या तक्त्यात माहिती भरुन या संचालनालयास पत्राद्वारे तसेच सॉफ्टकॉपी ( In one Excel having three sheets of Annex -B1,B2,B3 , Font – Calibri, Size-16) – "desk18@dtemaharashtra.gov.in" या ईमेल आयडीवर तात्काळ सादर करावी, जेणेकरुन सदर माहितीच्या आधारे तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपरोक्त योजनांसाठी डीबीटी पोर्टलबाबतची पुढील कार्यवाही करुन लॉगीन आयडी व पासवर्ड देण्यात येईल. अभिमत विद्यापीठांना लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त झाल्यानंतर त्या लॉगीन आयडीचा वापर करुन, लॉगीन आयडी अंतर्गत देण्यात आलेली डीबीटी पोर्टलवर उपलब्ध असलेल्या "User Manual" चा वापर करुन विद्यापीठाची माहिती अद्ययावत करावी.

डीबीटी पोर्टलवर, महाराष्ट्र राज्यातील अभिमत विद्यापीठाची नाव नोंदणी झाल्यानंतर,अभिमत विद्यापीठांनी महाराष्ट्र राज्यामध्ये शिष्यवृत्ती लागू करण्यात आलेल्या अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनाबाबतची माहिती देऊन, इतर शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी नसलेला व योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज भरुन घेण्यात यावे. डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांकडून अर्ज भरण्यासाठी "Post Matric scholarship" अंतर्गत "User Manual" देण्यात आलेले आहे.

तसेच, याबाबत संदर्भीय शासन निर्णयान्वये लागू केलेल्या सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व वरील बाबींच्या मार्गदर्शनाकरीता दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठक तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर बैठकीला उपस्थित रहावे.

**दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीचा दिनांक, वेळ व लिंक खालीलप्रमाणे.**

दिनांक - ०५.०६.२०२३

वेळ - दुपारी ४.०० वाजता

बैठकीची लिंक - meet.google.com/dtb-scnz-pkv

(डॉ. विनोद म. मोहितकर.)

प्र.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत —

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई. यांना माहितीसाठी सविनय सादर. (लक्षवेध -श्री. नितिन धिरटकर, कक्ष अधिकारी)

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहिती व सदर बैठकीस उपस्थित राहण्यासाठी.

३. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ४०० ००१. यांना माहिती व सदर बैठकीस उपस्थित राहण्यासाठी.

४. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१. यांना माहिती व सदर बैठकीस उपस्थित राहण्यासाठी.

५. प्रणाली व्यवस्थापक, कार्यासन क्र.३ यांनी दूरदृष्य प्रणाली बैठकीसाठी लागणारी सर्व सोई-सुविधा बैठक सभागृहात कार्यान्वित करुन द्यावी तसेच, बैठकीवेळी आपल्या कार्यासनातील तज्ञांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबत कळवावे.

६. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२ व १० यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

■ महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांकडून भरलेल्या अर्जांची तपासणी व लाभ वितरणाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे ( Work flow :- Student -> Institute Clerk -> Institute Principal -> Regional Office )

१) **संस्थांच्या दोन स्तरांवर :- ( क्लार्क व प्राचार्य )**

– **क्लार्क स्तरांवर** –

- विद्यार्थ्यांचे भरलेले अर्ज संस्थेच्या क्लार्क लॉगीनमध्ये उपलब्ध होतात. संस्थेच्या क्लार्ककडून मंजूर केलेले अर्ज संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होतात तसेच क्लार्कना अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास अर्ज विद्यार्थ्यांना दुरुस्तीसाठी त्यांच्या लॉगीनमध्ये पाठविण्यात येतात.
- सदरची त्रुटी दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांना दोन पर्याय देण्यात आलेले आहेत. १) भरलेला अर्ज रद्द करुन नवीन भरावा किंवा २) भरलेल्या अर्जामधील त्रुटी दूर करुन पुन्हा तपासणीसाठी संस्थेच्या क्लार्कना पाठवणे.

– **प्राचार्य स्तरांवर** –

- संस्थेच्या क्लार्ककडून मंजूर केलेले अर्ज संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होतात तसेच प्राचार्यांना अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास अर्ज क्लार्कना दुरुस्तीसाठी त्यांच्या लॉगीनमध्ये पाठविण्यात येतात.
- संस्थेच्या प्राचार्यांकडून मंजूर केलेले अर्ज विभागीय कार्यालयाच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होतात.
- पहिला हप्ता प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचा दुसऱ्या हप्त्याची रक्कम प्राप्त होण्यासाठी संस्थेच्या क्लार्क/प्राचार्य लॉगीनमध्ये उपलब्ध झालेल्या विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरणे.

२) **विभागीयस्तरांवर :-**

- संस्थेच्या प्राचार्यांकडून मंजूर केलेले अर्ज संबंधित विभागीय कार्यालयाच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होतात तसेच विभागीय कार्यालयाला अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास अर्ज संस्थेच्या प्राचार्यांना दुरुस्तीसाठी त्यांच्या लॉगीनमध्ये पाठविण्यात येतात. तसेच,
- संबंधित भरलेल्या अभ्यासक्रमासाठी / वर्षासाठी सक्षम प्राधिकरणाकडून शुल्क मंजूर झालेले नसल्यास ( Benefit detail "Zero" ) अर्ज प्राचार्यांना सक्षम प्राधिकरण यांचेकडून शुल्क मंजूर करण्यासाठी परत पाठविण्यात येतात.

➢ **लाभ वितरणाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे :**

- पात्र ठरलेल्या अर्जांची महाडीबीटी कडून **आधार बेस्ड भरलेल्या अर्जांचे** योजनेच्या लाभाच्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्यासाठी अलॉटमेंट करुन डीडीओ लॉगीनमध्ये देयक जनरेट करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येते. नॉन आधार बेस्ड भरलेल्या अर्जांचे जोपर्यंत विद्यार्थी आधार क्रमांक अपडेट करत नाही ( आधार क्रमांक भरत नाही ) तोपर्यंत अलॉटमेंट करण्यात येत नाही.

- विभागाकडे संबंधित योजनेच्या उपलब्ध अनुदानाच्या रक्कमेनुसार देयक जनरेट करुन अधिदान व लेखा कार्यालयाला मंजूरी साठी सादर करण्यात येते.
- अधिदान व लेखा कार्यालयाकडून मंजूर करण्यात आलेली रक्कम शासनाच्या सेंट्रल पूल खात्यात विद्यार्थी/संस्था यांना वितरणासाठी जमा करण्यात येते.

➢ **विद्यार्थ्यांना डी.बी.टी. पोर्टलमार्फत लाभ वितरणाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे :**

- **विद्यार्थ्यांना पहिला हप्ता मिळण्यासाठी -**

  योजना राबविणा-या विभगाकडुन ज्या विद्यार्थ्यांची लाभाची रक्कम सेंट्रल पूल खात्यामध्ये जमा करण्यात येते. अशा विद्यार्थ्यांच्या योजनेच्या लाभाची रक्कम **महाआयटी कडुन विद्यार्थ्यांना आधार संलग्नीत बॅंक खात्यात थेट जमा करण्यात येते.**

- **विद्यार्थ्यांना दुसरा हप्ता मिळण्यासाठी -**

  पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त झालेल्या विद्यार्थांना दुसरा हप्ता देण्यासाठी संस्थेच्या लॉगीनमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती भरण्यासाठी यादी प्राप्त होते. ज्या विद्यार्थ्यांची **उपस्थिती ५० % किंवा त्यापेक्षा जास्त असते,** अशा विद्यार्थ्यांच्या लाभाच्या रक्कमेचे देयक अधिदान व लेखा कार्यालयाला सादर करुन , मंजूर करण्यात आलेली रक्कम शासनाच्या सेंट्रल पूल खात्यात विद्यार्थी यांना वितरणासाठी जमा करण्यात येते व विद्यार्थ्यांच्या योजनेच्या लाभाची रक्कम **महाआयटी कडुन विद्यार्थ्यांना आधार संलग्नीत बॅंक खात्यात थेट जमा करण्यात येते.**

Letter- ANNEX-B (B1,B2,B3 )

## Details of Deemed to be University - (Annex-B1)

| Details of Deemed to be University | | | | | | | | | | | | Details of Registrar of University | | | | Details of Deputy Registrar of University | | | | Name of Department of Running Diploma /Graduation/Post Graduation Professional Courses (i.e.Technical Education /Higher Education /Medical Education) | Total Number of Institutes running Technical Education | | Total Number of Institutes running Medical Education | | Total Number of Institutes running Higher Education | | Is Name of University already Registered on DBT Portal ( YES/NO) | If Registered on DBT Portal then Login id of DBT Portal | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Name of Deemed to be University | Year of Establishment | University Registration Number/ Letter of Maharashtra Government | AISHE ( All India Survey on Higher Education) Code (ex.-U-XXXX) | Postal Address of University | Taluka of University | District of University | Pin code | State | University Website | Email Id University | Phone Number with STD code (Ex.0XX - XXXXXX...) | Name | Email Id | Phone No.with STD Code (0XX-XXXXX..) | Mobile No | Name | Email Id | Phone No.with STD Code (0XX-XXXXX..) | Mobile No | | In Maharashtra | Out Side Maharashtra | In Maharashtra | Out Side Maharashtra | In Maharashtra | Out Side Maharashtra | | Principal Login ID | Clerk Login ID |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## Course Details-of Deemed to be University - ( Annex-B2 )

| In Annex -B1 ,If Department Name Technical Education then Name of PROGRAMME (i.e..Architecture And Town Planning,Design,Engineering And Technology,Hotel Management And Catering , Management ,Mater of Computer Application ,Pharmacy ,Planning | LEVEL OF COURSE(ex.Diploma ,Post Graduate,Under Graduate) | PROGRAMME (ex.Architecture And Town Planning,Design,Engineering And Technology,Hotel Management And Catering , Management ,Mater of Computer Application ,Pharmacy ,Planning) | PROGRAMME NAME ( ex. Bachelor of Architecture Bachelor of Design, Bachelor of Engineering (B. E.) / Bachelor of Technology (B. Tech.),Bachelor of H.M.C.T., Bachelor of Pharmacy ,Bachelor of Planning,M.B.A./M.M.S.Master in Computer Application (M.C.A.) , Master of Architecture , Master of Engineering (M. E.) / Master of Technology (M. Tech.) , Master of Engineering (M. E.) / Master of Technology (M. Tech.)(Integrated) , Master of H.M.C.T. ,Master of Pharmacy , Master of Planning ,Pharm.D. (Post Baccalaureate) , Pharma D ,Post H.S.C. Diploma in H.M.C.T.,Post H.S.C. Diploma in Pharmacy (D. Pharm.) ,Post H.S.C. Diploma in Surface Coating Technology ,Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | COURSE NAME( ex. Computer Science and Engineering,Information Technology, Electronics and Telecommunication, Mechanical Engineering, Civil Engineering ,Chemical Engineering ,Electrical Enineering,Electronics and Tele-communication Engineering etc.) | Is Course Approved by Apex Body (YES/NO) | If Course Approved by Apex Body then Name of Apex Body (ex.AICTE/ PCI/COA etc.) | Course Start Year (YYYY) | Is Professional (Yes/No) | Is Active (Yes/ No) | Course Pattern ( Annual / Semester) | Course Duration (In Years) | Course Duration (In Months) | Total Intake of Course | Course Mode ( Full Time / Part Time) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| | | | | | | | | | | | | | | |

## Institute Information comes under Deemed to be University -(Name of Deemed to be University-______________ (Annex - B3)

| Sr.No. | AISHE ( All India Survey on Higher Education) Code (ex.-C-XXXXX) | Name of Institute | Establishment Year (yyyy) | Institute Registration Number | Name of University | Postal Address of Institute | Taluka of Institue | District of Instittue | Pin code | State | Institute Comes Under - MMRDA/PMRDA/Aurangabad City/Nagpur City/Other | Institute Website | Email Id | Phone Number with STD code (Ex.0XX - XXXXXX...) | Details of Institute Director | | | | | Details of Institue Registrar | | | | | DBT Portal | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | Name of Director | Aadhaar Number | Name as on Aadhaar Card | Email Id | Mobile No.linked with Aadhaar Card | Name of Institute Registrar | Aadhaar Number | Name as on Aadhaar Card | Email Id | Mobile No.linked with Aadhaar Card | Is Institute Already Registered on DBT Portal ( YES/NO) | If Registered on DBT Portal then Login id - Principal Login ID | Clerk Login ID |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

| Deemed to be Universities - University Grants Commission | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr.No. | Type | Name of the University | Address | Zip |
| 1 | Deemed to be | Bharati Vidyapeeth | LBS Road Next to Alka Talkies 13, Sadashiv Peth, Pune, Maharashtra 411030Pune | 411030 |
| 2 | Deemed to be | Central Institute of Fisheries Education | Panch Marg, Off Yari Road, Versova, Andheri (West), MumbaiMumbai - 400 061 | 400061 |
| 3 | Deemed to be | D.Y Patil Educational Society | 869 E ward Line Bazar Kasaba Bavada KolhapurKolhapur-416006 | 416006 |
| 4 | Deemed to be | Datta Meghe Institute of Higher Education and Research | Sawangi (Meghe), Wardha, Maharashtra Sawangi (Meghe)Wardha | 442107 |
| 5 | Deemed to be | Deccan College Postgraduate & Research Institute | Yerwada, Pune | 411006 |
| 6 | Deemed to be | Defence Institute of Advanced Technology | Girinagar,Pune, | 411 025 |
| 7 | Deemed to be | Dr. D.Y. Patil Vidyapeeth | Sant Tukaram Nagar, Pimpri, Pune, MaharashtraPune | 411018 |
| 8 | Deemed to be | Gokhale Institute of Politics & Economics | 846 Shivajinagar, BMCC Road, Pune | 411004 |
| 9 | Deemed to be | Homi Bhabha National Institute, Regd. Office | Training School Complex, Anushaktinagar, MumbaiBhabha Atomic Research CentreCentral Complex, Mumbai-85 | 400094 |
| 10 | Deemed to be | Indira Gandhi Institute of Development Research | Gen General Arun Kumar Vaidya Marg,Film City Rd, IGIDR,Nagri Niwara Cooperative Housing Society, Goregaon, Mumbai, | 400065 |
| 11 | Deemed to be | Institute of Chemical Technology | Institute of Chemical Technology, Nathalal Parekh Marg, Matunga, Mumbai - 400019MumbaiMaharashtra | 400019 |
| 12 | Deemed to be | International Institute for Population Sciences | GOVANDI STATION ROAD DEONAR MUMBAIMumbai - 400 088. | 400088 |
| 13 | Deemed to be | Krishna Institute of Medical Sciences | Near Dhebewadi Road, Malkapur, KaradTal.Karad,Distt. Satara,-415539Maharashtra | 415539 |
| 14 | Deemed to be | MGM Institute of Health Sciences | MGM Campus, Sector-18, Kamothe | 410209 |
| 15 | Deemed to be | Narsee Monjee Institute of Management Studies | V. L. Mehta Road, Vile Parle, West, Mumbai, Maharashtra, India,Mumbai-400056 Maharashtra | 400056 |
| 16 | Deemed to be | Padmashree Dr.D.Y. Patil Vidyapeeeth | Sector - 07, Nerul, Navi Mumbai Pin-400 706 | 400706 |
| 17 | Deemed to be | Pravara Institute of Medical Sciences | P.O. Loni,B.K-413736, Tal., RahataDist; Ahmednagar (M S) | 413736 |
| 18 | Deemed to be | Symbiosis International University | Gram: Lavale, Tal: Mulshi, Dist.: PuneDistrict: PuneMaharashtra | 412115 |
| 19 | Deemed to be | Tata Institute of Fundamental Research | Homi Bhaba Road,Mumbai- 400 005 | 400005 |
| 20 | Deemed to be | Tata Institute of Social Sciences | V.N.Purav Marg, DeonarMumbai-400 088. | 400088 |
| 21 | Deemed to be | Tilak Maharashtra Vidyapeeth | Vidyapeeth Bhavan, MukundnagarGultekdi, Pune-411037 | 411037 |

राज्यातील अभिमत विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता शासनाची प्रचलित शिष्यवृत्ती प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## शासन निर्णय क्र. सीटीसी-२०२०/प्र.क्र.२३/तांशि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २३ फेब्रुवारी, २०२३.

<u>संदर्भ</u> :-१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक ईबीसी-२००९/प्र.क्र.१४६/मावक-२, दि.२७.०७.२००९.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, क्र.टीईएम-२०१०/(१२५/२०१०)/तांशि-४, दि.०६.११.२०१०.

३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्र.६९/२०२१ या जनहित याचिकेत दि.२०.०३.२०१५ रोजीचे आदेश.

४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७.

५) University Grants Commission Notification No.F.1-2/2018 (CPP-I/DU) UGC (Institutions Deemed to be Universities) Regulations, 2019, dated 20.02.2019.

६) शासन निर्णय समक्रमांक दि.१४.१०.२०२१ व दि.०७.१२.२०२१.

७) मा.न्या.श्री.एम.एन.गिलानी (निवृत्त) तथा माजी अध्यक्ष शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या समितीचा दि.२७.१२.२०२१ रोजीचा अहवाल.

८) मा.राज्य मंत्रिमंडळाच्या दि.३१.०१.२०२३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२७.०७.२००९ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने आदेश निर्गमित केले होते. त्याचप्रमाणे खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संदर्भाधीन क्र.०२ येथील दि.०६.११.२०१० च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१०-११ करीता आदेश निर्गमित केले होते. या दोन्ही शासन निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना राज्यातील अभिमत विद्यापीठांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना अनुज्ञेय नव्हती.

वरील दोन्ही शासन निर्णयातील तरतूदींच्या विरोधात, राज्यातील अभिमत विद्यापीठातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाची प्रचलित शिक्षण

शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ येथे जनहित याचिका क्र.६९/२०११ दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेत मा.उच्च न्यायालयाने राज्यातील अभिमत विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शासनाच्या प्रचलित शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेनुसार लाभ अनुज्ञेय करण्याबाबत संदर्भाधीन क्र.(०३) येथील दि.२०.०३.२०१५ च्या न्यायनिर्णयाद्वारे आदेश पारीत केले होते.

मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील अभिमत विद्यापीठे, त्यांचे अभ्यासक्रम, अभ्यासक्रमांची विद्यार्थीक्षमता इ. च्या आधारावर अभ्यासक्रमनिहाय, सामाजिक संवर्गनिहाय विद्यार्थीक्षमता, संबंधित प्रशासकीय विभागाद्वारे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या प्रतिपूर्तीचे प्रमाण या बाबी विचारात घेऊन प्रतिविद्यार्थी शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी एक सर्वसमावेशक सुत्र विहित करुन शासनास शिफारस करण्यासाठी संदर्भाधिन क्र.(०६) येथील दि.०७.१२.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मा.न्या.श्री.एम.एन.गिलानी (निवृत्त) तथा माजी अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय तज्ञ समिती गठीत करण्यात आली होती.

वरील समितीने आपला अहवाल संदर्भाधिन क्र.(०७) येथील दि.२७.१२.२०२१ च्या पत्रान्वये समितीच्या शिफारशींसह शासनास सादर केला. सदर अहवालातील समितीवर सोपविण्यात आलेल्या कार्यकक्षेतील प्रमुख शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.:-

१) समितीने राज्य शासनाच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचे लाभ हे राज्यातील अभिमत विद्यापीठांतील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांना अनुज्ञेय करण्याकरिता खालीलप्रमाणे ३ सुत्रांची शिफारस केली आहे.:-

(१) **साधी सरासरी (Simple Average)** - संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रत्येक खाजगी, व्यावसायिक संस्थेकरिता निर्धारित करण्यात आलेल्या शुल्काच्या बेरजेस, संबंधित अभ्यासक्रमाच्या एकूण खाजगी व्यावसायिक संस्थांच्या संख्येने भागाकार केल्यास येणारी संख्या म्हणजे साधी सरासरी होय.

(२) **महत्तम व लघुत्तम शुल्काचा मध्य (मध्यम शुल्क) (Mean Value)** - संबंधित अभ्यासक्रमासाठी आकारण्यात आलेले महत्तम शुल्क व लघुत्तम शुल्क यांची बेरीज भागिले दोन म्हणजे महत्तम व लघुत्तम शुल्काचा मध्य (मध्यम शुल्क) होय.

(३) **विद्यार्थी संख्या भारीत सरासरी (weighted Average)** - भारित सरासरी शुल्क म्हणजे संस्थानिहाय शुल्क गुणिले प्रवेशित विद्यार्थी यानुसार आलेली संख्या, त्यानुसार आलेल्या सर्व संख्यांची बेरीज भागिले एकूण विद्यार्थीसंख्या यानुसार आलेली संख्या म्हणजे विद्यार्थी संख्या भारीत सरासरी (weighted Average) होय.

२) **विद्यापिठीय स्थलांतरण घटक/गुणक (Discounting Factor)** - समितीने विद्यार्थ्यांमध्ये अभिमत विद्यापीठाला प्रथम प्राधान्य देण्याची ओढ काही अंशी कमी व्हावी, याकरिता विद्यापिठीय स्थलांतरण घटक/गुणक (Discounting Factor) ची शिफारस केली

असून त्यामध्ये समितीने विहित केलेले सुत्र अंगीकारुन जे काही शुल्क देय होते त्यामध्ये सरसकट १० ते २० टक्क्यांची कपात करुन शुल्काची प्रतिपुर्ती करण्याची शिफारस केली आहे.

समितीचा अहवाल व त्यातील प्रस्तावित शिफारशींबाबत शिष्यवृत्तीशी सर्वसंबंधित विभागांसमवेत (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, अल्पसंख्यांक विभाग व कृषि, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभाग) केलेल्या विचारविनिमयाअंती समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार अभ्यासक्रम, सुत्रनिहाय शिष्यवृत्तीची रक्कम परिगणित करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे ठरले. त्यानुसार शिष्यवृत्तीच्या रक्कमा अभ्यासक्रम, सुत्रनिहाय परिगणित करुन सर्वसंबंधित विभागांना उपलब्ध करुन देण्यात आल्या. तद्नंतर सर्वसंबंधित विभागांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायासह शिष्यवृत्तीची तरतूद अंदाजित करुन व संदर्भाधीन क्र.(०५) येथील अभिमत विद्यापीठातील प्रवेश प्रकिया व शुल्क प्रक्रिया याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.२०.०२.२०१९ च्या अधिसूचनेन्वये प्रसिध्द केलेले नियम विचारात घेऊन अभिमत विद्यापीठातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या प्रतिपूर्तीकरिता सविस्तर प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला. तद्नुषंगाने संदर्भाधीन क्र.(०८) नुसार दि.३१.०१.२०२३ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सविस्तर विचारविनिमय होऊन झालेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

१. राज्यातील अभिमत विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या व राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीकरिता पात्र ठरणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ हया शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचे लाभ अनुज्ञेय करण्यात येत आहेत.

२. वरीलप्रमाणे शिष्यवृत्तीची देय रक्कम ही प्रतिविदयार्थी अनुज्ञेय करण्याकरिता मा.न्या.श्री.एम. एन.गिलानी (निवृत्त) तथा माजी अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालातील प्रस्तावित केलेल्या खालील शिफारशी स्वीकृत करण्यात येत आहेत.:-

१. विद्यार्थीसंख्या भारित सरासरी (Weighted Average)
२. विद्यापीठीय स्थलांतरण घटक / गुणक (Discounting Factor)

३. मा.न्या.श्री.एम.एन.गिलानी (निवृत्त) यांच्या अहवालातील विद्यार्थीसंख्या भारित सरासरी (Weighted Average) ह्या सुत्रानुसार परिगणित केलेल्या शुल्कातून विद्यापीठीय स्थलांतरण घटक / गुणक नुसार २० टक्क्यांची कपात करुन राज्यातील अभिमत विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विदयार्थ्यांना सर्वसंबंधित प्रशासकीय

विभागांच्या एकत्रित शुल्काच्या प्रतिपूर्तीपोटी रु.११८.६४ कोटी एवढ्या अंदाजित केलेल्या शिष्यवृत्तीच्या तरतुदीस मान्यता देण्यात येत आहे.

४. मा.न्या.श्री.एम.एन.गिलानी (निवृत्त) यांच्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे सुत्रानुसार अभ्यासक्रमनिहाय व सुत्रनिहाय अंदाजित केलेल्या शुल्कांचे तपशिलवार विवरणपत्र या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये संदर्भासाठी सोबत जोडले आहे.

५. प्रशासकीय विभागांनी अभ्यासक्रमनिहाय, सामाजिक प्रवर्गनिहाय शुल्कांच्या तरतुदींची पडताळणी करुन शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद संबधित प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेल्या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित करुन वितरित करण्याची कार्यवाही करावी.

६. वरीलप्रमाणे शिष्यवृत्तीचे प्रदान हे संदर्भाधीन क्र.(०४) येथील दि.०७.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार डीबीटी पोर्टलमार्फत करण्याची कार्यवाही संबधित प्रशासकीय विभागाव्दारे करण्यात यावी. याकरिता विद्यार्थ्यांची अभिमत विद्यापीठनिहाय व अभ्यासक्रमनिहाय नावांची नोंदणी व इतर आवश्यक ती प्रक्रिया संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या स्तरावरुन माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या समन्वयाने पार पाडावी.

७. संदर्भाधीन क्र.(०४) येथील दि.०७.१०.२०१७ च्या शासन निर्णयानुसार शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रकियेद्वारे प्रवेश घेणे व शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे निश्चित केल्याप्रमाणे शिक्षण शुल्क आकारणे ह्या अटी, अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांकरीता लागू असणार नाहीत.

८. अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्यासंदर्भात अभिमत विद्यापीठे, प्रशासकीय विभाग, संबंधित क्षेत्रिय कार्यालये / संचालनालये / आयुक्तालये यांच्यामध्ये समन्वय राखून योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता संबधित प्रशासकीय विभागाने त्यांच्या स्तरावरुन शिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी कार्यपध्दती निश्चित करावी.

९. राज्यातील अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्याकरीता राज्यातील अभिमत विद्यापीठांनी राज्य शासनासोबत समन्वय साधण्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी व त्याप्रमाणे राज्य शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभाग, संचालनालये / आयुक्तालये यांना अवगत करावे.

१०. अभिमत विद्यापीठांच्या कार्यपध्दतीबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भाधीन क्र.(०५) येथील दि.२०.०२.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये UGC (Institutions Deemed to be Universities) Regulations, २०१९ हे नियम प्रसिध्द केले आहेत. सदर नियमांच्या अंमलबजावणीसंदर्भात राज्यातील सर्व अभिमत विद्यापीठांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.:-

१०.१. राज्य शासनाद्वारे संदर्भाधीन क्र.(०४) येथील दि.०७.१०.२०१७ च्या शासन निर्णयानुसार शासनाच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत द्यावयाच्या शिष्यवृत्तीसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सर्वसंबंधित प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील विविध अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती देण्यात येते. त्यामुळे अभिमत विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना राज्य शासनाची शिष्यवृत्ती देण्यासाठी अभिमत विद्यापिठातील अभ्यासक्रम, शिक्षण शुल्क व प्रवेशित विदयार्थी याबाबतची माहिती ही राज्य शासनाच्या सर्वसंबधित प्रशासकीय विभागांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

१०.२. राज्यातील अभिमत विद्यापीठांनी UGC (Institutions Deemed to be Universities) Regulations, २०१९ मधील उप नियम क्र.८ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार अभिमत विद्यापीठामध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांबाबतची तसेच सुरु करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांबाबतची माहिती ही दरवर्षी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबधित संचालनालय/आयुक्तालय यांना तसेच शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभागांना सादर करावी.

१०.३. सदर नियमातील नियम क्र.११ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार राज्यातील प्रत्येक अभिमत विद्यापीठाने त्यांच्या अधिनस्त विद्यापीठे, संस्था यामध्ये प्रवेश व शुल्क याबाबतची प्रशासकीय संरचना स्थापित करण्याची, त्याचप्रमाणे प्रवेशित विदयार्थी, शुल्क याबाबतची माहितीपुस्तिका (Prospectus) ही संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल वेळोवेळी संचालनालयामार्फत सर्व संबंधित प्रशाकीय विभागांना सादर करावा.

१०.४. नियम क्र.१८ मधील तरतुदीनुसार अभिमत विद्यापिठांनी निधी (Funds), लेखापरीक्षण (Audits), वार्षिक अहवाल (Annual Reports) इ. लेखाजोखा ठेवण्याची कार्यवाही करावी.

१०.५. वरील नियमातील नियम १९ मध्ये नमूद सूचनांनुसार अभिमत विद्यापिठांनी त्यांच्या अधिनस्त प्रशासकीय संरचना तसेच अभिमत विद्यापीठांतर्गत अँटी रॅगींग इ. बाबत दिलेल्या तरतुदीनुसार व्यवस्था / कक्ष स्थापित करण्याची कार्यवाही करावी.

११. सदरचा शासन निर्णय हा दि.३१.०१.२०२३ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२. प्रस्तुत शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०२१५१५५९०५२२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NITIN JYOTINATH GHIRATKAR

Digitally signed by NITIN JYOTINATH GHIRATKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=bbb712ac44dfd391a1a4d7d0b24cf743fa81a59477dff3f6805f105ac91db1e0, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2152ID9E84E57776BA1E64B660F3699BDD08917801A19974A72D566F57F5401, cn=NITIN JYOTINATH GHIRATKAR
Date: 2023.02.24 15:50:22 +05'30'

(नि. ज्यो. घिरटकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री (सर्व), मंत्रालय, मुंबई
४. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
१०. मा.संसद सदस्य (महाराष्ट्र राज्यातील)
११. मा.विधानसभा सदस्य (सर्व), विधान भवन, मुंबई
१२. मा.विधानपरिषद सदस्य (सर्व), विधान भवन, मुंबई
१३. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१५. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई
२४. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
२६. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे

२७. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२९. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३०. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३२. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३३. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
३४. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३५. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
३६. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
३७. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व)
३८. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३९. कुलसचिव, सर्व अभिमत विदयापिठे, महाराष्ट्र राज्य
४०. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
४२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
४३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४५. सह / उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४६. कार्यासन (तांशि-३/विशि-३/मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४७. निवडनस्ती/तांशि-४.

शासन निर्णय क्र.सीटीसी-2020/प्र.क्र.23/तांशि-4, दि. 23.02.2023 सोबतचे परिशिष्ट "अ"

शुल्क नियामक प्राधिकरणाकडून शैक्षणिक वर्ष 2020-21 या वर्षाकरिता निश्चित केलेल्या अभ्यासक्रमनिहाय शुल्काच्या आधारे श्री.गिलानी समितीच्या सुत्रानुसार परिगणित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमनिहाय शुल्काचे विवरणपत्र

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | शुल्क नियामक प्राधिकरणानुसार शैक्षणिक शुल्क (रु.) | | |
|---|---|---|---|---|
| | | Weighted Avg (Institutewise tution fees X Total Institute number of Students/ Total No.of Students) | Simple Avg (Total Amount of tution Fees / Total No.of Institutes) | High/Low Mean (Lowest Fees+Highest tution Fees / 2) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | **Professional Courses of Technical Education** | | | |
| 1 | B.Tech.Computer Science and Engineering | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 2 | B.Tech. Information Technology | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 3 | B.Tech. Electronics and Telecommunication | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 4 | B.Tech. Mechanical Engineering | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 5 | B.Tech. Civil Engineering | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 6 | B.Tech Chemical Engineering | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 7 | B.Tech Electrical Engineering | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 8 | B.Tech.(Computer Science and Engineering) | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 9 | B.Tech (Electronics & Tele-Communication Engineering) | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 10 | Bachelor of Chemical Engineering | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 11 | B.Tech Fibres and Textile Processing Technology | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 12 | B.Tech Polymer Engineering and Technology | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 13 | B.Tech Food Engineering and Technology | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 14 | B.Tech Oil, Oleochemicals and Surfactants Technology | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 15 | B.Tech Surface Coating Technology | 109,327 | 97,159 | 116,500 |
| 16 | MBA | 121,909 | 111,852 | 188,000 |
| 17 | MCA | 92,101 | 82,740 | 102,000 |
| 18 | Hotel management BHMCT | 110,518 | 109,200 | 123,500 |
| 19 | MHMCT | 76,000 | 76,000 | 76,000 |
| 20 | DHMCT | 69,000 | 69,000 | 69,000 |
| 21 | Pharm.D | 122,310 | 105,833 | 122,500 |
| 22 | Polytechnic | 55,841 | 52,182 | 66,000 |
| 23 | Bachelor of Architecture | 125,927 | 120,314 | 125,000 |
| 24 | Diploma in Pharmacy | 69,323 | 69,068 | 95,000 |
| 25 | B.Pharmacy | 95,789 | 89,736 | 113,000 |
| 26 | M. Pharmacy | 128,082 | 118,379 | 109,500 |
| | **Professional Courses of Medical Education** | | | |
| 1 | MBBS | 911,738 | 925,267 | 1,105,000 |
| 2 | BDS | 339,853 | 338,850 | 402,500 |
| 3 | BAMS | 190,847 | 186,415 | 190,000 |
| 4 | BHMS | 80,996 | 77,793 | 86,500 |
| 5 | BSC NURSING | 78,731 | 76,373 | 82,500 |
| 6 | PBBSC NURSING | 78,372 | 74,854 | 70,000 |
| 7 | BPTH | 117,337 | 109,900 | 137,500 |
| | **Professional Courses of Higher Education** | | | |
| 1 | LLB (3 Yrs) | 22,764 | 21,826 | 20,375 |
| 2 | BA LLB (5 Yrs) | 25,082 | 19,044 | 34,860 |
| 3 | BA LLB (5Yrs) Un-aided | 25,082 | 19,044 | 34,860 |
| 4 | BA LLB ( Honours) | 25,082 | 19,044 | 34,860 |
| 5 | BBA LLB (5 yrs) | 25,082 | 19,044 | 34,860 |
| 6 | BBA LLB (Honours) | 25,082 | 19,044 | 34,860 |
| | | | | |